 आर.सी.सी.९४२/२०१९
निशाणी क्र – २२ .

सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्रं.२.ची साक्ष
देवा शपथ खरे सांगेण की,

नाव : एमरीन वसंत पाटील
वय : ६५ वर्षे, धंदा : घरकाम
राहणार : पिंपळे गुरव,पुणे.

**<u>सरतपास शपथेवर सरकारतर्फे सरकारी वकील श्रीमती कस्तुरे :-</u>**

१. फिर्यादी माझी मुलगी आहे. आरोपी क्र. १ माझा जावई आहे व आरोपी क्र. २ फिर्यादीची सासु आहे. फिर्यादीचे आरोपी क्र. १ सोबत दि. ०९.१२.२०१८ रोजी सेंट पॅट्रीक चर्च, फातिमा नगर पुणे येथे झाले. लग्नाचा खर्च आम्ही केला. लग्नामध्ये आरोपी क्र. १ ला अध्र्या तोळ्याची चैन, दोन अंगठ्या, लग्नाच्या वस्तु. लग्नानंतर फिर्यादी शिंदे छत्री येथे आरोपींचे घरी नांदण्यासाठी घरी गेली. लग्नावेळी फिर्यादी नोकरी करीत होती. सुरुवातीचा दीड महिना आरोपी फिर्यादीसोबत चांगले वागले. त्यानंतर फिर्यादी फोन करुन रडायची व आरोपी क्र. २ त्रास देत असल्याबाबत सांगायची. आरोपींच्या घरी सारख्या पाटर्या व्हायच्या व तेथे सर्व काम फिर्यादीला करावे लागायचे व नाही केले तर तीला ओरडायचे. एकवेळेस आरोपी क्र. १ ने फिर्यादीला फिश करी करण्यास सांगितले. परंतु त्यावेळी आरोपी क्र.२ तेथे आली त्यावेळी फिर्यादीच्या हातावर गरम पाणी सांडले. त्यावेळी फिर्यादी व आरोपींमध्ये सतत वाद होत होते म्हणून फिर्यादी माझ्या घरी आली. फिर्यादीला मारहाण व शिविगाळ झाली. याव्यतिरिक्त काही झाले नाही. त्यानंतर आम्ही भरोसा सेल येथे अर्ज केला होता. तेथे फिर्यादी व आरोपींना समजावून सांगितले. परंतु कोणताही फरक पडला नाही. आरोपी क्र. ३ दारु प्यायचे. आरोपी क्र. ३ फिर्यादीला कामावर सोडण्यासाठी व आणण्यासाठी येत असत व त्यावेळी ते दारु पित असत. या व्यतिरिक्त काही घडले नाही. पोलीसांनी माझ्याकडे चौकशी करुन माझे तपासटिपण नोंदवले होते. आरोपी आज न्यायालयात हजर आहेत.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्रीमती. अनु वर्गिस यांचेमार्फत</u>

२. हे म्हणणे खरे आहे की, माझेसमक्ष कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे आहे की, गैरसमाजातून फिर्यादी व आरोपींमध्ये वाद व्हायचे व त्याबाबत मला फिर्यादीने सांगितले आहे. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी व आरोपी क्र. १ मध्ये परस्पर संमतीने घटस्फोट घेण्याचे ठरले आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यानुसार सर्व तक्रारी मागे घ्यायच्या आहेत असे ठरले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीसांकडे

खोटे तपासटिपण नोंदवले आहे.

उलटतपास पुर्ण

फेरतपास नाही**.**

समक्ष,

सहि/-
(अ.अ.कुलकर्णी)
३रे सह प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
लष्कर न्यायालय, पुणे.

दिनांक : १७/०३/२०२६.